# Dadasaheb Jotiram Godse
## Arts ,Commerce ,Science College ,Vaduj

Welcome

Subject – Sociology, B.A.II Year

Dr. Gire S.M.

# स्त्री भ्रुण हत्या - एक सामाजिक समस्या

- आईच्या पोटात गर्भावस्थेतच मुली मारून टाकण्याच्या विकृत, हिंसक, संवेदनाहीन आणि अन्यायकारक समस्येने सध्या भारताला ग्रासलेले आहे. स्त्रीचा जन्मच नाकारणे ही आधुनिक युगातील विज्ञान युगातील सर्वात क्रूर आणि नीच कृती आहे. या ज्वलंत समस्येने गंभीर रूप धारण केले आहे.

# स्त्री भ्रुण हत्या

“स्त्री गर्भलिंग निदान करून गर्भपात करणे याला स्त्री भ्रूणहत्या संबोधले जाते”.

# स्त्री भ्रुण हत्या

- 'पुरुषप्रधान संस्कृती' आणि 'पुरुषवर्चस्वी समाज' अशा प्रकारची मानसिकता असलेल्या समाजात / कुटुंबात मुलांच्या (पुरुषांच्या) जन्माला प्राधान्य देऊन स्त्रियांच्या जन्मास विरोध केला जातो. अशा प्रसंगी स्त्रीच्या पोटातील गर्भाचे निदान करून तो गर्भ स्त्रीचा असल्यास गर्भपात करून त्याला नष्ट करण्यात येते. ह्यासाठी भारतात कायद्याने लिंग निदानाला बंदी आहे.

# स्त्री भ्रूणहत्येमागील कारणे

- मुली म्हणजे डोक्याला ताप ही मानसिकता अद्याप संपलेली नाही. हुंड्यासाठी होणारा छळ, ठराविक काळात मुलीची घ्यावी लागणारी काळजी या आगामी काळात होणारया त्रासाला घाबरण्याबरोबरच आणखी कारणांमुळे लोक मुलीला जन्माला घालण्याचे टाळत आहेत. मुलगी हे परक्याचे धन आहे. तिच्या वाढवण्यावर, शिक्षणावर होणारा खर्च वायफट जाणार आहे. ही एक मानसिकता तयार झाली आहे. हुंडय़ामुळे किंवा आणखी काही वेगळ्या कारणांमुळे समाजात घटस्फोटाचे प्रमाण वाढत आहे. घटस्फोट, मानसिक, शारीरिक त्रास या वैतागाला कंटाळून स्त्रिया आत्महत्येला कवटाळत आहेत. त्यामुळे आणखी बरयाच समस्या निर्माण होतात. या समस्यांना सामोरे जाण्याची भीती माणूस बाळगत आहे. उलट मुलगा म्हणजे आयुर्विम्यासारखा वाटत असतो. तो मोठा झाल्यावर सोबत राहून आधार देतो. मरणानंतर मोक्ष देतो आणि आपला वंश पुढे चालवत राहतो, असे लोकांना वाटत असते. वास्तविक, वंशाचा दिवा पाहिजे म्हणणारयाला आपल्या पणजोबाच्या अगोदरच्या कुणाचेच नाव सांगता येत नाही, तरीही वंशाच्या दिव्यासाठी हट्टाहास केला जातो.

- **भारतातील लिंगप्रमाणात लोकसंख्या**

  १९०१ साली ९७२ स्त्रियांची संख्या प्रति १००० पुरुष होती. २००१ साली ९३३ स्त्रियांची संख्या प्रति १००० पुरुष होती.

  महाराष्ट्रातील सहा वर्षांच्या खालील मुलींचे प्रमाण सन २००१ मध्ये ९१३ असे होते. मात्र २०११ च्या जनगणनेनुसार हे प्रमाण ८८३ इतके म्हणजे जवळ जवळ ३०% खाली उतरले आहे

# स्त्री भ्रूणहत्येवर उपाय

- आजच्या परिस्थितीचा विचार केला तर स्त्रियांचे कर्तृत्व मोठे असल्याचे दिसत आहे. असे कोणतेही क्षेत्र राहिलेले नाही, ज्याचे स्त्रियांनी नेतृत्व स्वीकारलेले नाही. अगदी दहावी-बारावीच्या परीक्षांमध्येही मुलीच आघाडीवर आहेत. असे असताना मुली नको म्हणणारे आपल्याच पायावर धोंडा मारून घेत आहेत, याची जाणीव त्यांना आलेलीच नाही. समाज रुढीला चिकटून, समाजाला घाबरून मुलाच्या प्रतीक्षेत स्त्री भ्रूण हत्या करणाऱ्या पालकांना सामाजिक संस्थांनी, कार्यकर्त्यांनी बळ देण्याची आवश्यकता आहे. गरीब घरातील मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी अशा संस्थांनी घेतल्यास या प्रकाराला बऱ्याच प्रमाणात आळा बसेल. परवा गुरु पौर्णिमेच्या निमिताने शिर्डी देवस्थानला तब्बल चार कोटी पेक्षा अधिक संपत्ती लोकांनी अर्पण केली. अशीच मोठी संपती देशभरातल्या देवस्थानांकडे आहे. ही संपत्ती देशाची आर्थिक दैना संपवून टाकू शकते. ही संपत्ती फारशी वापरात येत नाही. त्याचा काही संस्था वगळता सामाजिक कार्यासाठी विनियोग करत नाही. या पैशातून बऱयाच गोष्टी हो ऊ शकतात. परंतु यात म्हणावी अशी प्रगती दिसून येत नाही. अशा संस्थांनीही मुलींच्या समप्रमाणासाठी पावले उचलण्याची गरज आहे. शिवाय जी मंडळी मोठमोठ्या प्रमाणात देवस्थांना देणगी देतात. याच पैशातून अनेक गरीब मुलींचा उदरनिर्वाह आणि शिक्षणाच्या सोयी होऊ शकतात. ही जबाबदारी त्यांनी घेतली तर बरेच साध्य होणार आहे. आगामी काळातील मोठ्या अराजकतेपासून देशाची सुटका होणार आहे. माणसाची सेवा हीच ईश्वर सेवा आहे. देशसेवा हीच ईश्वरसेवा आहे, अशी वाक्ये केवळ पुस्तकातच राहिली आहेत. ती उपयोजनेत यायला हवीत
-

# Thank You

- **भारत सरकारकडून बदल**
- प्रसवपूर्व परिक्षणतंत्र कायद्याच्या अन्वये गर्भलिंग चाचणीवर बंदी घालण्यात आली आहे. तरीही अवैध पद्धतीने ह्या चाचण्या केल्या जातात.
- हे प्रकार रोखण्यासाठी शासनामार्फत गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र - लिंगनिवडीस प्रतिबंध कायदा १९९४ आणि सुधारित कायदा २००३ उपलब्ध आहेत. मात्र ह्या कायद्यांची म्हणावी तशी अमलबजावणी होताना दिसत नाही.